LIFE
TRUST
changing lives
changing destinies

# धारावी शिक्षकही आता बनतील टेक-सॅव्ही!

## *डीव्हीडीचा वापर करून आंगणवाडी शिक्षकांना इंग्रजी शिकवण्यासाठी बांद्रा और धारावीमध्ये लाईफ ट्रस्टतर्फे पायलट प्रोजेक्टची सुरूवात*

**मुंबई**, २० **एप्रिल** २००९: एका विशेष तसेच आपल्या प्रकारच्या अशा पहिल्याच उपक्रमामध्ये, लॅन्डमार्क इंटरनॅशनल इन्स्टिटयूट फॉर एम्पॉवरमेंट (लाईफ ट्रस्ट) ने धारावीच्या आंगणवाडी शालेय शिक्षकांना इंग्रजी शिकवण्याच्या नवीन पद्धतीची सुरूवात केलेली आहे. लाईफ ट्रस्ट धारावी झोपडपट्टयांमधील २५ आंगणवाडी शिक्षकांसाठी २ महिन्यांच्या पायलट प्रोजेक्टचे आयोजन करत आहे. या प्रोजेक्टच्या यशानुसार, यावर्षी हा प्रोजेक्ट ९५० शिक्षकांपर्यंत पोहोचवण्याची लाईफ ट्रस्टची योजना आहे.

आंगणवाडी हे एकीकृत पद्धतीने ६ वर्षांपर्यंतच्या मुलांसाठी केंद्र सरकारद्वारे स्थापण्यात आलेली पूर्वशालेय केंद्रे आहेत. भारतभरातील ग्रामीण, आदिवासी तसेच झोपडपट्टयांमध्ये राहणाऱ्या मुलांच्या योग्य विकासासाठी या उपक्रमाची सुरूवात करण्यात आलेली आहे. दहावी उत्तीर्ण झालेली व्यक्ती आंगणवाडी शिक्षक बनण्यासाठी पात्र आहे. भाषेच्या वापरामध्ये या शिक्षकांना पुढील प्रशिक्षण देण्याची गरज लाईफ ट्रस्टला भासली आणि म्हणूनच त्यांनी जागतिक भाषा इंग्रजीसाठी या उपक्रमाचा विकास केला.

या परियोजनेसाठी लाईफ ट्रस्टने आपल्या २डी ॲनिमेटर्सच्या मदतीने खास 'इंग्लिश डीव्हीडी' निर्माण केलेली आहे आणि शिक्षकांना अत्याधुनिक पोर्टेबल डीव्हीडी प्लेयर्सच्या मदतीने प्रशिक्षण दिले जाईल. इंग्रजी शिकणे सोपे आणि मनोरंजक बनवण्यासाठी लाईफ ट्रस्टने या डीव्हीडीमध्ये चित्र तसेच आवाजाचा वापर केलेला आहे. या वर्गामध्ये चर्चा, रोल-प्ले और क्विझसारख्या तंत्रांनी शिक्षकांची रूची वाढवली जाईल तसेच दर्जेदार शिक्षण प्रदान केले जाईल.

लाईफ ट्रस्टच्या व्यवस्थापकीय ट्रस्टी श्रीमती पूनम लालवानी म्हणाल्या "तंत्रज्ञानामुळे उपलब्ध शिक्षण तंत्रांमध्ये क्रांती येत आहे आणि लाईफ ट्रस्टमध्ये आम्ही, देशाच्या जन शाळा शिक्षण प्रणालीच्या पुनर्व्याख्येसाठी या कल्पनेचा वापर करत आहोत. आमच्या या नवीन उपक्रमामध्ये परंपरागत काळया फळयाऐवजी आधुनिक, तांत्रिकदृष्टया आधुनिक शिक्षण माध्यमाचा वापर करत आहोत आणि आम्हांला पूर्ण विश्वास आहे की यामुळे आम्हांला रचनात्मक परिणाम प्राप्त होतील. मौजमस्तीने पूर्ण तसेच आधुनिक वातावरणामध्ये, भारतातील प्रत्येक लहान मुलाला शाळेसाठी तयार करण्यामधील आमच्या समर्पित प्रयत्नांमध्ये हा उपक्रम म्हणजे एक आधार आहे."

या अभ्यासाच्या अखेर लाईफ ट्रस्टतर्फे तोंडी तसेच लेखी परीक्षाही घेण्यात येईल. यामुळे या उपक्रमाचा आकार आणि गुणवत्ता यांच्या आधारावर विश्लेषण केले जाईल. याव्यतिरिक्त, लाईफ ट्रस्ट ३० दिवस सर्व वर्ग रेकॉर्ड करतील, त्यामुळे त्यांना आपल्या अभ्यासक्रमामध्ये जरूरी बदल करणे सोपे जाईल.

“सध्या बांद्रा आणि धारावीमधील ४७५ आंगणवाड्यांवर आमचे लक्ष असून यात ९५00 मुले तसेच ९५0 शिक्षक आहेत. विद्यार्थ्यांसाठी अभ्यास रोचक बनवणे तसेच खासगी आणि सरकारी पूर्वशालेय विद्यार्थ्यांप्रमाणेच या ही मुलांना बनवण्यासाठी, आंगणवाडी शिक्षकांना जरूरी कौशल्य प्रदान करण्याचा आमचा प्रयत्न आहे. आमच्यासारखीच विचारधारा असलेले लोक तसेच कॉर्पोरेट्सच्या मदतीने आमच्या या प्रोजेक्टमध्ये मुंबईतील ५000 हूनही अधिक आंगणवाडी शिक्षकांपर्यंत पोहोचण्याची क्षमता आहे.”

औपचारिकेतर आणि रचनात्मक शिक्षण सहाय्यक सामग्री प्रदान करण्यासाठी लाईफ ट्रस्टने मुंबईच्या बृहन्मुंबई म्युनिसिपल कॉन्सिल (बीएमसी) च्या शिक्षण विभागाशी निकट सहयोग प्रस्थापित केलेला आहे. करिअर कॉन्सिलिंग, इफेक्टिव्ह स्टडी हॅबिट्स, मॅथ मेड ईझी, इंग्लिश मेड ईझी, व्हॅल्यू एज्युकेशन, एज्युकेशन ऑन व्हील्स, चिल-झोन, इंडस्ट्रियल ट्रिप्स आणि मानसिक रूपात आव्हान असलेल्या मुलांच्या शाळांसोबत इंटरव्हेंशनसारखे अनेक प्रोजेक्ट्स ४९ बीएमसी शाळासाठी लाईफ ट्रस्ट आयोजित करत असतात.

हे सर्वच उपक्रम खूपच यशस्वी सिद्ध झालेले आहेत आणि यांमुळे बीएमसी शाळांमधील दहावीच्या विद्यार्थ्यांच्या गुणांमध्ये वाढ होण्यास मदत मिळत आहे. हा नवीन उपक्रमही अशाचप्रकारे प्रभावी सिद्ध होईल याबाबत लाईफ ट्रस्टला पूर्ण खात्री आहे. शिक्षण आणि शालेय जीवनातील रोचक प्रवासामध्ये या मुलांनाही पुढे जाण्याची संधी या उपक्रमामुळे मिळेल.

**लाईफ ट्रस्टबद्दल माहिती**

साल २000 मध्ये चेन्नईत, लॅन्डमार्क इंटरनॅशनल फाऊंडेशन फॉर एम्पॉवरमेंट (लाईफ) ची सुरूवात एक नोंदणीकृत पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टच्या रूपात करण्यात आली. *‘स्कूल चलो’* ला भारतातील प्रत्येक मुलाचा मंत्र बनवण्याच्या दृष्टीकोनासह, लाईफ भारतातील सरकारी शाळा शिक्षण प्रणालीच्या उन्नतीसाठी अनेक ॲक्टिव्हिटीजचे आयोजन करतात. शिकण्यात अडथळे असलेल्या तसेच मानसिकदृष्टया आव्हान असलेल्या विद्यार्थ्यांसाठी नवनवीन उपक्रमांची सुरूवात लाईफने केलेली आहे. मुंबई, चेन्नई आणि बेंगलोरमध्ये लाईफची उपस्थिती आहे आणि येत्या काही वर्षांमध्ये आपले अस्तित्व भारतभरात प्रस्थापित करण्याची यांची योजना आहे.

अन्य एन्जसीज् तसेच समान विचारधारा असलेल्या लोकांसह, कलात्मक आणि प्रभावी कार्यक्रमांच्या माध्यमातून, सर्वच हिस्सेदार आणि समाजाला सामिल करून पब्लिक स्कूल सिस्टमसोबत काम करणे तसेच त्यांना समर्थन देणे हे लाईफचे मिशन आहे.

अधिक माहितीसाठी भेट द्या www.lifetrustindia.org अथवा संपर्क करा:


| | |
|---|---|
| **संदीप फर्नांडिस / जय देसाई**<br>फोरसाईट कम्युनिकेशन्स<br>sandipfernandes@gmail.com / j.desai83@gmail.com<br>+९१ ९८१९२६६५५१ / ९८२00६0१0७ | **सोनम चावला**<br>लाईफ ट्रस्ट<br>sonamkchawla@gmail.com<br>+९१ ९८१९४३६७0२<br>(0२२) २४९१ 0२८७ |